**राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था परळ, मुंबई**

(भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद ) व

**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई**

यांचा संयुक्त उपक्रम

# "प्रजनन विषयक आरोग्यामध्ये पुरुषांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने नागरी वस्त्यांमध्ये करण्यात येणारी उपाययोजना"

## प्रजनन मार्ग व लैंगिक संबंध यातून निर्माण होणारे आजार (आर.टी.आय./एस.टी.आय.)

### प्रजनन/लैंगिक मार्गाच्या आजाराविषयी पुरुषांकरिता संदेश :-

१. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजार या विषयी योग्य माहिती मिळण्या करीता जवळच्या आरोग्य केंद्रास भेट द्या किंवा डॉक्टरांशी संपर्क साधा.

२. जर आपणांस किंवा आपल्या पत्नीला लैंगिक आजार झाला असेल तर आपली व आपल्या पत्नीची तपासणी करुन उपचार करुन घ्या, जेणेकरुन पुर्नःसंसर्ग टाळता येईल.

३. लैंगिक आजाराचा संसर्ग टाळण्याकरीता निरोधचा वापर करा. शंका असल्यास समुपदेशकाला भेटा व चर्चा करा.

४. लैंगिक आजार झालेल्या व्यक्तींना एच.आय.व्ही. ची बाधा होण्याचा जास्त संभव असतो.

५. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजाराविषयी चर्चा करण्यास लाजू नका किंवा भिती बाळगू नका.

### प्रजनन मार्गाचे आजार म्हणजे काय ?

प्रजनन मार्गाचे आजार हे एक प्रकारचे लैंगिक आजारच आहेत. या आजारामध्ये गर्भाशय, गर्भनलिका, योनीचे बाह्यांग, योनी, गर्भाशयाचे तोंड, अंडाशय हे स्त्रीयांमधील अवयव बाधीत होत असतात. ओटीपोटावरील सुज अर्थात पेल्व्हीक इनफ्लामेटरी डिसीज (PID) म्हणजेच बिजांडकोष, बीजवाहक नलिका, गर्भाशय मुख आणि गर्भाशय या सारख्या प्रजनन संस्थेचा विभिन्न अवयवांना झालेला जंतुसंसर्ग हाही एक प्रजनन आजार आहे. ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते किंवा जन्माला येणाऱ्या बाळास त्याचा संसर्ग होऊ शकतो.

### प्रजनन मार्गातील आजाराचे मुख्यत्वे तीन प्रकार आहेत :-

अ. बाह्यांगावर दिसणारे आजार - प्रजनन अवयवांवर आढळून येणारी वाढ

ब. आंतरीक आजार - वैद्यकिय प्रकियेमुळे होणारे आजार

क. लैंगिक संबंधातुन पसरणारे आजार - संभोगाद्वारे पसरणारे आजार

## लैंगिक संबंधातुन पसरणारे आजार म्हणजे काय ?

व्यक्ती-व्यक्तीं मधील लैंगिक संबंधाद्वारे होणाऱ्या जंतुसंसर्गामुळे जे संसर्गिक आजार होतात त्यांना लैंगिक आजार म्हणतात. हा आजार अतिसुक्ष्म जंतुमुळे होतो. या जंतुंना विषाणु किंवा जीवाणु म्हणतात. वेगवेगळ्या जीवाणु किंवा विषाणुंमुळे वेगवेगळ्या प्रकारचे लैंगिक आजार होतात. एकापेक्षा जास्त व्यक्तींशी लैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला या रोगाचा संसर्ग होण्याचा जास्त धोका असतो. काहीही लक्षणे न दिसल्यामुळे इलाज न झालेले आजार काही वेळा तांबी बसवल्यानंतर बळावतात तर गरोदरपणात अशी लक्षणे न दिसलेल्या आजारांमुळे गर्भास संसर्ग होतो व अशा संसर्गामुळे गर्भाशयाचा कॅन्सरही होऊ शकतो.

| लैंगिक आजाराची पुरुषांमध्ये आढळणारी लक्षणे | लैंगिक आजाराची स्त्रियांमध्ये आढळणारी लक्षणे |
|---|---|
| १. लिंगावर पुरळ व फोड येणे. | १. योनीतुन स्त्राव येणे. |
| २. लिंगातून पिवळसर द्रव किंवा पू येणे. | २. ओटीपोटात दुखणे |
| ३. लिंगावर सुज किंवा लिंगाच्या आजुबाजुला जांघेत गाठ येणे | ३. योनीमध्ये खाज येणे किंवा लैंगिक संबंधाच्या वेळेस दुखणे |
| ४. लिंगाला खाज येणे किंवा लैंगिक संबंधाच्या वेळेस दुखणे | ४. योनीमार्गात लालसर फोड किंवा पुरळ येणे. |
| ५. तोंडामध्ये फोड, जखमा किंवा त्वचा लालसर होणे | ५. योनीवर किंवा आजुबाजूला जांघेत गाठ येणे. |
| | ६. तोंडामध्ये फोड, जखमा, जळजळ किंवा त्वचा लालसर होणे. |

**प्रतिबंध कसा कराल !**

१. आपल्या गुप्तांगाची नियमित स्वच्छता राखा. आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ रहा.
२. आपणांस किंवा आपल्या जोडीदारास लैंगिक आजार झालेला असेल तर यौन संबंधाच्या वेळेस निरोध वापरा.
३. आपल्या जोडीदाराचा देखील योग्य इलाज करुन घ्या.
४. योग्य मार्गदर्शनाकरिता समुपदेशकाला भेटा.

**उपचाराविषयी :-**

- प्रजनन मार्गाचे आजार/लैंगिक आजार पुर्णपणे बरे करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या सल्यानुसार उपचार करावा.
- आपण पुर्णपणे बरे झालो आहोत याची खात्री करुन घेण्यासाठी डॉक्टरांची पुन्हा भेट घ्यावी.

● आजाराची लक्षणे पुर्णपणे बरी झाली तरी डाक्टरांनी दिलेली औषधे मध्येच बंद करू नयेत.

● गर्भवती स्त्रीला आजार झाल्यास गर्भाची तपासणी जरूर करून घ्यावी.

**उपचार न केल्यास काय होऊ शकते :-**

| पुरुषांमध्ये | स्त्रियांमध्ये | स्त्री व पुरुष दोघांमध्ये |
|---|---|---|
| ● मुत्रमार्ग आकसल्याने लघवी करताना अडवण जाणवते.<br>● आरोग्य अतिशय गंभीर स्वरुपाचे परिणाम होतात. | ● ओटीपोटावर सुज येते.<br>● सारखे सारखे गर्भपात होतात.<br>● गर्भाशयाच्या आजुबाजुला सुज येते<br>● गरोदर स्त्रीच्या गर्भाला विकलांगता येऊ शकते. | ● वंध्यत्व येते.<br>● लैंगिक आजार झालेला असल्यास HIV ची बाधा होण्याची जोखिम ५ ते २० टक्क्यांनी जास्त असते. |

**नवजात बालक व गुप्तरोग :-**

● गर्भवती स्त्रीला लैंगिक आजार झालेला असेल तर तिच्या होणाऱ्या बाळालाही हा आजार होऊ शकतो. तसेच त्याचा होणाऱ्या बाळाच्या आरोग्यावर कायम स्वरुपी परिणाम होऊ शकतो.

● गर्भवती स्त्रीने लैंगिक आजारावर उपचार करवून न घेतल्यास जन्माला येणारे मुल जन्मतःच अपंग व आजारी असू शकते. तसेच गर्भपात होण्याची किंवा मृत बालक जन्मास येण्याची शक्यता असते.

**लक्षात ठेवा :-**

१. लैंगिक अवयव तेल, पेट्रोल, सोडा लिंबू वापरुन धुतले तर रोग बरे होत नाहीत.

२. लहान बालकांबरोबर किंवा प्राण्यांबरोबर लैंगिक संबंध ठेवल्याने हा आजार बरा होत नाही.

३. हकीम, भगत यांचेकडे जावून उपचार घेतल्यामुळे हे आजार बरे होत नाहीत.

**लैंगिक आजार व त्यांची लक्षणे :-**

परमा
१. लिंगामधून स्त्राव किंवा पू येणे.
२. लघवी करतांना जळजळ व द्राव येणे.
३. स्त्रियांमध्ये योनी स्त्राव.

ट्रिकोमोनीयासीस
१. स्त्रियांमध्ये अनियमित मासिक स्त्राव
२. खाज येणे.
३. संभोगा दरम्यान दुखणे.

| | | |
|---|---|---|
| सिफिलिस | १. | लिंगावर जखम, पुरळ तथा पू युक्त फोड येणे. |
| | २. | एक किंवा त्यापेक्षा अधिक दुखणारी अथवा न दुखणारी गाठ. |
| | ३. | लिंगावर अथवा आजुबाजुला येत जात राहणारी सुज. |
| मृदवण | १. | स्त्रियांमध्ये ओटीपोट दुखणे. |
| चामखिळी | १. | लिंगाच्या चामडीवर अतिरिक्त मांस येवून वाढणे. |
| | २. | लिंगावर अथवा लिंगाजवळ गाठ येणे. |
| | ३. | लिंगामधून सतत रक्तस्त्राव होणे. |
| कॉंडीलोमा लॅटा | १. | गुदद्वारामध्ये जखम होणे, भेगा पडणे, लालसर होणे, रक्त येणे, खाज येणे तसेच चट्टे येणे. |
| ल्युकोप्लाकिया | १. | तोंडामध्ये डाग पडणे, जखमा येणे, भेगा पडणे, लालसर होणे, रक्त येणे, खाज येणे, सुजणे, उंचवटा येणे. |
| मोनिलियासीस | १. | अनियमित दुर्गंध व स्त्राव |
| | २. | स्त्रियांमधील अनियमित मासिक स्त्राव |
| | ३. | खाज येणे. |
| | ४. | संभोगा दरम्यान दुखणे. |

**गैरसमज :-**

१. तेल, पेट्रोल, सोडा लिंबू वापरुन लैंगिक अवयव धुतल्याने लैंगिक आजार बरे होतात.

२. लहान बालकांबरोबर किंवा प्राण्यांबरोबर लैंगिक संबंध ठेवल्याने हा आजार बरा होतो.

३. हकीम, भगत यांचेकडे जावून उपचार घेतल्यामुळे हे आजार बरे होतात.

**समज :-**

१. तेल, पेट्रोल, सोडा लिंबू वापरुन लैंगिक अवयव धुतल्याने लैंगिक आजार बरे होत नाही.

२. लहान बालकांबरोबर किंवा प्राण्यांबरोबर लैंगिक संबंध ठेवल्याने हा आजार बरा होत नाही.

३. हकीम, भगत यांचेकडे जावून उपचार घेतल्यामुळे हे आजार बरे होत नाहीत.